आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
२५ मे २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब असल्याचं प्रधानमंत्र्यांचं ‘मन की बात’ मधे प्रतिपादन

- नक्षली कारवायांविरोधातल्या लढ्याबरोबरच दैनंदिन जीवनातल्या विविध विषयांवर साधला संवाद

- कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीतल्या ठेवींवरच्या व्याजाकरता गेल्या वर्षीप्रमाणेच सव्वा आठ टक्के दर जाहीर

- दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी गेलेल्या प्रतिनिधिमंडळांच्या कतार, बहरीन, मॉस्कोला भेटी

**आणि**

- आयपीएल क्रिकेटमध्ये चेन्नई सुपर किंग्जचा गुजरात टायटन्सवर ८३ धावांनी विजय

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर ती आपला निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.  या कारवाईने जगभरातल्या दहशतवादाविरुद्धच्या लढाईला नवीन विश्वास आणि उत्साह दिला असल्याचं  मोदी यांनी आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमात सांगितलं. आज या कार्यक्रमाचा एकशे बावीसावा भाग प्रसारित झाला. ऑपरेशन सिंदूरमुळे देशभरात एकजूट आणि देशाभिमानाची भावना जागृत झाल्याचं सांगून ते म्हणाले की ठिकठिकाणी निघालेल्या तिरंगा यात्रांमधे त्याचं दर्शन घडतं. या मोहिमेनंतर संपूर्ण देशात वोकल फॉर लोकल या संकल्पनेलाही नवी ऊर्जा मिळाली आहे, असं सांगून प्रत्येकानं स्वदेश निर्मित वस्तूंना प्राधान्य देण्याचा निर्धार करावा असं आवाहन त्यांनी केलं.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता

२५ मे २०२५ - रविवार

**होल्ड बाईट... MKB 25.5.25 SWADESHI AWAHAN**

आंतरराष्ट्रीय योग दिनाला आता एका महिन्यापेक्षाही कमी काळ उरला असून, प्रत्येकाने आता योगाभ्यासाशी जोडून घ्यावं असं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं. यंदाच्या योगदिनासाठी प्रधानमंत्री विशाखापट्टणममधल्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

स्वच्छ भारत तसंच कचऱ्यापासून विशेषतः टाकाऊ कागदापासून पुनर्निर्मितीबाबत देशभर होत असलेल्या प्रयत्नांची उदाहरणंही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. जालना इथं १०० टक्के पुनर्प्रक्रिया केलेल्या कच्च्या मालापासून पॅकेजिंग रोल आणि पेपर कोर बनवले जात असल्याचा उल्लेख त्यांनी केला. एक टन कागदाच्या पुनर्प्रक्रियेमुळे १७ झाडं वाचतात आणि हजारो लिटर पाण्याची बचत होते, अशी माहिती त्यांनी दिली.

नुकत्याच साजरा झालेल्या जागतिक मधमाशी दिनाचा उल्लेखही त्यांनी केला. गोडव्यासोबतच आरोग्य, स्वयंरोजगार आणि आत्मनिर्भरतेतही मधाचं योगदान मिळू शकत असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. गेल्या अकरा वर्षात भारतात मधमाशी पालन क्षेत्रात मधुर क्रांती घडून आली आहे असं ते म्हणाले. मधमाशांच्या संरक्षण संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांबद्दल सांगतांना त्यांनी पुणे इथल्या अमित याच्या प्रयत्नांचा उल्लेखही केला. याबद्दल अमित यानं आकाशवाणीकडे आपली भावना व्यक्त केली.

**होल्ड बाईट... अमित**

गेल्या केवळ पाच वर्षांच्या काळातच गुजरातच्या गिर जंगलातली सिंहांची संख्या ६७४ वरून ८९१ झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. वन्यजीव संरक्षणासाठी आपल्याला कायमच जागरूक राहण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरबद्दल नागरिक सेनादलांप्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त करत आहेत. आता ऐकू या **परभणी** जिल्ह्यातल्या नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ….

**होल्ड बाईट -**

**<><><><><>**

कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीतल्या ठेवींवरच्या व्याजाकरता केंद्र सरकारने गेल्या वर्षीप्रमाणेच सव्वा आठ टक्के दर जाहीर केला आहे. याचा लाभ देशातल्या सात कोटीपेक्षा जास्त पगारदारांना मिळत आहे.

२०२२- २३ मधे कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीतल्या ठेवींवर ८ पूर्णांक १५ शतांश टक्के व्याज मिळत होतं. गेल्या आर्थिक वर्षात ईपीएफओ ने सुमारे २ कोटी १६ लाख रुपयेपर्यंतचे दावे निकाली काढले. ही आजवरची सर्वाधिक रक्कम आहे.

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं आज कतारमध्ये दोहा इथं शूरा परिषदेच्या उपसभापती डॉ. हमदा अल सुलैती आणि इतर कतारी खासदारांची भेट घेतली. शिष्टमंडळानं कतारच्या विधिमंडळाला ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली आणि दहशतवादा विरुद्धच्या जागतिक लढाईत पाठिंबा देण्याचं आवाहन केलं. हे शिष्टमंडळ येत्या काही दिवसांत दक्षिण आफ्रिका, इथिओपिया आणि इजिप्तला भेट देणार आहे.

खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाने बहरीनच्या शूरा कौन्सिलचे अध्यक्ष अली बिन सालेह अल सालेह आणि बहरीनचे उपप्रधानमंत्री शेख खालिद बिन अब्दुल्ला अल खलिफा यांची भेट घेतली. खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं आज दक्षिण कोरियाला भेट दिली. खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं, न्यूयॉर्कमध्ये ९/११ स्मारकाला भेट दिली. दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना त्यांनी श्रद्धांजली वाहिली.

द्रविड मुनेत्र कळघम पक्षाच्या खासदार कनिमोळी यांच्या अध्यक्षतेखालच्या शिष्टमंडळानं मॉस्को दौरा यशस्वीपणे पूर्ण केला असून आता ते स्लोव्हेनियाकडे रवाना झाले आहेत. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त अरब अमिरातला गेलेल्या शिष्टमंडळानं आपला दौरा पूर्ण केला असून ते आता काँगोमध्ये पोहोचले आहेत.

<><><><><>

भाजप शासित मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची एक दिवसीय परिषद आज दिल्लीत झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद झाली. या परिषदेत प्रधानमंत्र्यांनी विकासाचा वेग वाढवण्यावर आणि लोकांना डबल इंजिन सरकारचा फायदा मिळावा यावर भर दिला. भाजपच्या सुशासन विभागानं आयोजित केलेल्या या बैठकीत सुशासनाच्या मुद्द्यांबाबत चर्चा झाली. यावेळी ऑपरेशन सिंदूरच्या यशासाठी भारतीय संरक्षण दल आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे अभिनंदन करण्यात आले. तर केंद्र सरकारच्या जातिय जनगणना करण्याच्या निर्णयाबद्दल ही अभिनंदन करण्यात आलं. भाजपाशासित सर्व २० राज्यांचे २० मुख्यमंत्री आणि १८ उपमुख्यमंत्री या परिषदेत सहभागी झाले होते. या परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. नागपूर इथं आज संध्याकाळी त्यांचं आगमन होईल. उद्या कामठी इथं काही संस्थांचं भूमिपूजन आणि उद्घाटन शहा यांच्या हस्ते होईल. त्यानंतर ते नांदेडला रवाना होतील. दक्षिण मुंबईतल्या माधवबाग लक्ष्मीनारायण मंदिराच्या दीडशेव्या वर्धापनदिन महोत्सवाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस  उपस्थित राहणार आहेत. मंदिराला दीडशे वर्षं पूर्ण झाल्याबद्दल येत्या २७ मे रोजी उत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर  चेन्नई सुपर किंग्जनं गुजरात टायटन्सवर ८३ धावांनी विजय मिळवला. चेन्नई सुपर किंग्जनं दिलेल्या २३१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सला १८ षटकात सर्व बाद १४७ धावा करता आल्या.

दुसरा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयमवर सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना सुरु आहे. सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनरायझर्स हैदराबादच्या १३ षटकांत २ बाद १७५ धावा झाल्या आहेत.

**//<><><><><>//**